# अमर रहे... अमर रहे... अजितदादा अमर रहे...



दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com



वर्ष : ०५ | अंक : १६८, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.३० जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# अजितदादा अनंतात विलीन !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन झाले आहेत. दादांना अखेरचा निरोप देण्यासाठी महाराष्ट्र लोटला होता. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अजित दादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या दादाला निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांनी अजित दादा अमर रहे च्या घोषणा दिल्या. देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील सर्व वरिष्ठ नेते आणि अधिकारी उपस्थित होते. अंत्यसंस्कारावेळी कार्यकर्त्यांच्या अश्रुंचा बांध फुटला त्यांनी 'परत परत या अजित दादा परत या' अशी घोषणाबाजी केली.

अजित दादा यांचे पार्थिव सकाळी काटेवाडी येथील निवासस्थानी आणण्यात आले होते. बारामतीकरांनी काळजावर दगज ठेवत शेवटचं दर्शन घेतलं, त्यानंतर फुलांनी सजवलेल्या ट्रकमधून दादांची अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठानच्या मैदानाकडे नेण्यात आलेली, तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूल मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर लाखोंच्या संख्येने जनगसागर लोटल्याचं पाहायला मिळाला. पार्थ आणि जय पवार या दोघा पुत्रांनी दादांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला.



अजित पवार यांच्या अचानक निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या धक्क्याने सर्वच जण हादरले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह देशभरातील अनेक दिग्गजांनी अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आज शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, म हाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.

याशिवाय विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे, म हसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री हसन मुश्रीफ, आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश, खासदार निरजजी चंद्रशेखर, मंत्री गणेश नाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, दत्तात्रय भरणे, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, मंगलप्रसाद लोढा, संजय राठोड, कु.आदिती तटकरे, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, प्रा. डॉ. अशोक उईके, नरहरी झिरवाळ तसेच राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर, आकाश फुंडकर उपस्थित होते.

प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

अंत्यसंस्कारापूर्वी अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात पहाटेपासूनच जनसागर उसळला होता. सामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी शांतपणे रांगेत उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

## अजित पवारांचा विमान अपघात कसा झाला?



**मुंबई–बारामती मार्गावर उड्डाण करणारे व्हीएसआर व्हेंचर्स प्रा. लि. कंपनीचे 'लिअरजेट ४५' हे खासगी विमान २८ जानेवारी रोजी सकाळी बारामती विमानतळावर उतरण्याच्या प्रयत्नात भीषण अपघातास सामोरे गेले. या दुर्घटनेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये दोन वैमानिक आणि तीन प्रवासी होते. या अपघाताची चौकशी विमान अपघात तपास ब्यूरोकडून (एएआयबी) सुरू करण्यात आली आहे.**

- २८ जानेवारीला सकाळी ०८:१८ वाजता विमानाने प्रथम बारामतीशी संपर्क साधला.
- विमान ३० नॉटिकल मैल अंतरावर असताना पुणे कंट्रोलने त्यांना दृश्य हवामान परिस्थितीत (व्हिज्युअल मेटेरॉलॉजिकल कंडिशन्स) उतरण्याची परवानगी दिली.
- वैमानिकांनी वारा व दृश्यमानतेबाबत विचारले असता वारा शांत असून, दृश्यमानता सुमारे ३००० मीटर असल्याचे सांगण्यात आले.
- धावपट्टी क्रमांक ११ वर अंतिम टप्प्यात असताना धावपट्टी न दिसल्याने पहिला प्रयत्न रद्द करून विमानाने गो-अराउंड' घेतला.
- गो-अराउंड केल्यानंतर विमानाला त्याच्या स्थानाबद्दल विचारले असता वैमानिकाने धावपट्टी ११च्या फायनल अप्रोचवर असल्याचे सांगितले.
- 'एटीसी 'कडून त्यांना धावपट्टी दिसताच कळवण्यास सांगण्यात आले. त्या वेळी 'धावपट्टी दिसत नाही, दिसल्यावर कळवतो' असे सांगितले.
- वैमानिकाकाने काही क्षणांतच 'धावपट्टी दिसत आहे' असे कळवले.
- सकाळी ०८ : ४३ वाजता धावपट्टी क्रमांक ११ वर उतरण्याची परवानगी देण्यात आली. मात्र, वैमानिकाकडून परवानगीबाबत प्रतिसाद मिळाला नाही.
- सकाळी ८:४४ वाजता धावपट्टीच्या टोकाजवळ आगीच्या ज्वाळा दिसल्या आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचल्या.
- विमानाचे अवशेष धावपट्टी क्रमांक ११च्या 'थेशोल्ड'च्या डाव्या बाजूला आढळून आले.



देशाचे गृहमंत्री अमित शहा व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करतानाचा क्षण...



अक्षराज



# राजकारणातले 'दादा' पर्व संपले !

**बुधवार २८ जानेवारीची सकाळ महाराष्ट्रासाठी सकाळ न ठरता काळ रात्र ठरली कारण या सकाळी महाराष्ट्राच्या राजकारणातील धडाडीचा लोकनेता उपमुख्यमंत्री अजित पवार काळाच्या पडद्याआड गेले. बुधवारी सकाळी ९ वाजता टीव्हीवर बातम्या पाहत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात ही ब्रेकिंग न्यूज ऐकली आणि काळजाचा ठोका चुकला. अजित पवार हे या अपघातातून सहिसलामत वाचावेत अशी प्रार्थना करत असतानाच अजित पवारांच्या निधनाची बातमी टीव्हीवर झळकली आणि मन सुन्न झाले.**



या बातमीने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली ही बातमी खोटी निघावी अशी अनेकजण प्रार्थना करत होते पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. दादा आपल्यात नव्हते. क्षणात होत्याचे नव्हते झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. कार्यकर्ते, नेते, तरुण, वृद्ध, महिला सगळ्यांच्याच अश्रुंचा बांध फुटला. दादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक वादळ होते. चार दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवणारा हा वाघ नागरिकांना कायमचा सोडून जरी गेला असला तरी आपल्या कार्याने त्यांनी नागरिकांच्या मनावर जो ठसा उमटवला तो कधीही निघून जाणार नाही. दादा म्हणजे कामाचा माणूस. दादाकडे गेले की काम होणारच असा विश्वास लोकांना असायचा. काम होण्यायोग्य असेल तर लगेच करणारा आणि होण्यायोग्य नसेल तर तोंडावर नाही म्हणणारा. पोटात एक आणि ओठात एक असे राजकारणी दादा नव्हते जे पोटात आहे तेच बोलणारा आणि तेच करणारा. कडक शिस्तीचा पण तितकाच दिलदार मनाचा. मिश्किल, सुस्वभावी मनात येईल ते पटकन बोलून टाकणारा. बोलताना कशाचीही तमा न बाळगणारा पण आपण बोलल्याने कोणाचे मन दुखावले गेले हे लक्षात येताच जाहीर दिलगिरी व्यक्त करणारा आणि त्यासाठी जाहीर प्रायश्चित घेणारा, स्वतः वेळेचे बंधन पाळणारा आणि इतरांना वेळेचे महत्व पटवून देणारा. तरुणांना निर्व्यवसनी राहण्याचा सल्ला देणारा, चुकीला चूक आणि बरोबर असेल तर बरोबर म्हणणारा, कार्यकर्ता असो की नेता, स्वपक्षातील असो की विरोधातील चुकीचे वागत असेल तर त्याला वडिलकीच्या नात्याने खडसावणारा आणि त्याच नात्याने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, सतत सत्तेत राहूनही विरोधी पक्षांशी मैत्रीचे संबंध जपणारा, सकाळी सहा वाजता कामाला सुरुवात करणारा आणि ते काम दर्जेदार व्हावे असा हट्ट धरणारा, केवळ आणि केवळ महाराष्ट्राचा विकास हेच डोक्यात असणारा आणि त्यासाठी दिवसाचा रात्र करणारा, भाजप, शिवसेनेसारख्या हिंदुत्ववादी पक्षाशी हातमिळवणी करून सत्ता स्थापन करणारा तरीही शिव, ,शाहू, फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार न सोडणारा, त्या विचारांशीच एकनिष्ठ राहणारा, कुटुंब आणि राजकारण यांची योग्य सांगड घालणारा, कुटुंबात राजकारण आणि राजकारणात कुटुंब येऊ न देणारा दादा म्हणजे राजकारणातील वेगळेच रसायन होते. प्रत्येक गाव खेड्यातील कार्यकर्त्याला दादा म्हणजे आपला नेता वाटत होता. जवळपास चार दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या दादांच्या राजकीय जीवनाची सुरुवात १९८१- ८२ साली छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून झाली. भारतीय राजकारणातले द्रष्टे नेते काका शरद पवार यांनी त्यांच्यातील नेतृत्व गुण हेरून त्यांना राजकारणात आणले. १९९१ साली आपल्या नेतृत्व गुणाची चुणूक दाखवून दादांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सत्तांतर घडवून आणले. त्याच वर्षी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यावर देखील आपले वर्चस्व मिळवले. दादांच्या नेतृत्व गुणाची पारख झाल्याने १९९१ साली शरद पवारांनी दादांना थेट खासदारकीची संधी दिली. खासदार म्हणून मोठ्या मताधिक्याने जिंकून आलेल्या दादांनी काकांसाठीच खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीत आमदारकी लढवली तेव्हापासून कामाच्या आणि लोकसंपर्का च्या जोरावर दादा बारामती तालुक्यातून सलग आठ वेळा विक्रमी मतांनी आमदार म्हणून निवडून आले. १९९१ साली पहिल्यांदाच आमदार झालेल्या दादांना सुधाकरराव नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि कृषी, फलोत्पादन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्रीपद दिले. १९९९ नंतर त्यांनी ग्रामविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता ही मंत्रिपदे सांभाळी. जलसंपदा हे खातेही २०१० पर्यंत त्यांच्याकडेच होते. अर्थमंत्री म्हणून तर त्यांनी विक्रम केला. महाराष्ट्राचे अर्थमंत्रिपद त्यांनी सर्वाधिक काळ भूषवले. दादांनी सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचा विक्रम केला. सहा वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे दादा हे एकमेव राजकीय नेते असतील. दरम्यानच्या काळात त्यांच्या गळ्यात विरोधी पक्षनेत्याची माळही पडली. १९९९ साली शरद पवारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना केल्यावर राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह घरोघरी पोहचवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. शरद पवार दिल्लीचे राजकारण करत असल्याने महाराष्ट्रातील राष्ट्रवादीची धुरा त्यांच्याच खांद्यावर होती. त्यांच्यामुळेच राष्ट्रवादी कॉंग्रेसला कायम सत्तेत राहता आले. दादांची जशी राजकारणार पकड होती तशीच पकड त्यांची कला, क्रीडा, साहित्य, सहकार, शिक्षण, जलसिंचन या क्षेत्रावर देखील होती. प्रत्येक क्षेत्राचा बारकाईने अभ्यास करून त्यात सर्वोत्तम देणारा अजित पवारांसारखा दुसरा नेता नाही. त्यांचा इतका कामाचा झपाटा असणारा नेता पुन्हा होणार नाही. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांचा सारखा नेता पुन्हा होणार नाही. त्यांच्या निधनाने राजकारणातील 'दादा' पर्व संपले असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. धडाडीचे लोकनेते असणारे सर्वांचे लाडके अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## दादा, तुम्ही वेळ चुकवली!



मंगळवारी (दि. २७ जानेवारी) अजितदादा आणि मी असे आम्ही दोघे मंत्रिमंडळ बैठकीत एकत्र होतो. पाठोपाठ मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीची बैठक माझ्या कक्षात झाली; तेथेही दादा माझ्यासोबत होते. महाराष्ट्रात पायाभूत सुविधांवर अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक खर्च होतो, यावर दादांनी प्रश्न उपस्थित केला. प्रकल्प लांबू नयेत, यासाठी आम्ही दोघांनीही आसूड उठविले. सार्वजनिक बांधकाम खात्याने सरकारचे ७६४ कोटी कसे वाचविले, याची माहितीही देण्यात आली. दादांना आनंद झाला. सदोदित तिजोरीची काळजी करणारा अर्थमंत्री म्हणून मी निश्चिंत असायचो. 'अशाच गोड बातम्या प्रत्येक बैठकीत देत जा,' अशी कोपरखळीही त्यांनी मारली. पण, अशा बातम्या ऐकण्यासाठी पुढच्याच दिवसापासून आपण नसू, हे मात्र त्यांनी सांगितले नाही. ही बैठक झाल्यानंतर पुन्हा पाऊण तास आम्ही माझ्या दालनात गप्पा मारत बसलो होतो. नियती निष्ठुर असते, आपले काही चालत नाही. दादा, तुम्ही आजवर कधीही वेळ चुकवली नव्हती, या वेळी मात्र चुकवलीत. दादा, ही खंत कायम राहील, तुम्ही अकाली 'एक्झिट' घेतली.

बुधवारी सकाळी बारामतीजवळ विमान अपघात झाल्याची बातमी कानावर आली, तेव्हाही इतके काही विपरीत घडेल, असे वाटले नव्हते. डॉक्टर जोवर काही सांगत नाहीत, तोवर कोणत्याही बातमीवर विश्वास ठेवायला मन धजावत नव्हते. सुप्रियाताईंशी बोलणे होत होते. पण अखेर ती वाईट बातमी आलीच. माझा जवळचा, दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला. ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. कधीच विस्मरणात जाणार नाही, असा धक्का देणारा हा प्रसंग आहे.

दादा हे कायम माझे मित्र होते. खूप जवळून असे काम आम्ही २०१९पासून केले असले तरी त्याही पूर्वी विकासाच्या किंवा राज्यहिताच्या विषयांवर आम्ही एकमेकांसोबत होतो. दूरगामी व्हिजन असलेले नेते फार कमी असतात. दादा हे त्यापैकी एक. शब्दाला जागणारा नेता, मित्र कसा असतो, हे मी अत्यंत जवळून दादांबाबत अनुभवले. कितीही संकट आले तरी शब्दाला किंमत असते आणि प्रसंगी ती मोजायचीही असते, हे दादांकडून शिकण्यासारखे आहे. काही इनिंग्ज आम्ही नव्याने सुरू केल्या होत्या. ही इनिंग प्रदीर्घ चालेल, असे वाटत असतानाच दादांनी अकाली एक्झिट घेतली. २०१४ नंतर त्यांच्या तोंडी कायम माझे नाव 'सीएम साहेब' असे असायचे. २०१९मध्ये ते उपमुख्यमंत्री झाले आणि मी विरोधी पक्षनेता. पण, सभागृहात बोलताना ते हमखास मला 'सीएम साहेब' म्हणायचे. मग हळूच जीभ चावून 'देवेंद्रजी' म्हणायचे.

आमची मैत्री राजकारणापलीकडची होती. अवांतर विषयांवर बोलण्याची मैफल दादा सोबत असले की घडायची. आम्ही कितीदा रात्री उशिरापर्यंत गप्पा करीत बसायचो. पण, त्यातही कामाच्या विषयांची त्यांची यादी तयार असायची. कोणत्या विषयांवर बोलायचे आहे, याचा कागद हाती असायचा. धीरगंभीर विषयांवर बोलून झाले की दादांचे व्यक्तिमत्त्व खुलायचे. मग त्यांच्यातील कुणाची आणि कशाचीच पर्वा न करणारे असे उत्तुंग आणि दिलखुलास दादा व्यक्त व्हायचे. त्यांच्यातील भावनाप्रधान दादा फार कमी लोकांनी पाहिले. पण, मला तेही दादा अनुभवता आले. कारण, आम्ही फार छोट्या कालखंडात पराक्रमच तेवढे केले. राजकारणात अनेकदा माणसे वरकरणी पाहिली जातात; त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहिले जात नाही. पण, कामाचा प्रचंड आवाका आणि ठायी असलेला अनुभव या अर्थाने दादा एक अतिशय मोठे नेतृत्व. सकाळी सात वाजता दिवस सुरू करणारे दादा थांबत नसत. सरकारमध्ये असताना अनेकदा कठोर निर्णय घ्यावे लागतात. ते क्षणिक अप्रिय वाटत असले तरी दीर्घकालीन जनहिताचे असतात. अशा वेळी राजकीय कौशल्य पणाला लागत असते. व्यवस्थापन कौशल्यात जोखीम आणि हिंमत दोन्ही ठेवावी लागते. असे निर्णय घेण्यातही दादा अग्रेसर असत. त्यामुळे त्यांच्यापुढे एखादी फाईल गेली किंवा विषय गेला तर दोनच उत्तरे ऐकू यायची. एकतर होकार किंवा नकार. 'पाहतो करतो' ही शैली दादांना मान्यच नव्हती. या शैलीने लोक त्या क्षणी दुखावतातही. पण, ती दीर्घकाळासाठी जोडलीही जातात. सभागृहात उत्तरे देतानासुद्धा गुळगुळीत नाहीत, तर ठामपणे उत्तरे देताना ते दिसायचे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सभागृह सुरू होण्यापूर्वी दादा सभागृहात यायचे; मग ते मुंबई असो की नागपूर. सभागृहातील नवीन सदस्यांना शिस्त आणि नियम शिकवण्यातही त्यांचा नेहमी पुढाकार असायचा. मंत्रिमंडळ बैठकीत येण्यापूर्वी प्रत्येक प्रस्तावाचा अभ्यास करून ते आलेले असत. १८-२० विषय असले तरी नेमक्या कोणत्या विषयात कोणता मुद्दा उपस्थित करायचा, हे त्यांना ठावूक असे.

# गांधीजींची श्रीरामभक्ती !

श्रीरामाविषयी गांधीजींच्या मनात लहानपणापासून आस्था होती. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात रामराज्य स्थापित करण्याचा त्यांचा मानस होता. श्रीरामाचा पारदर्शक राज्यकारभार, त्यांची न्यायनिपुणता, जनतेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची श्रीरामांची वृत्ती त्यांच्या मनाला भुरळ घालत असे. रामराज्याला गांधीजी खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य मानत असत. अहिंसेच्या बळावर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा निर्धार केल्यानंतर देशातील लक्षावधी नागरिकांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. इंग्रजांच्या लाठ्या खाल्ल्या, उपोषणे केली, प्राणही गमावले. असे कोणते बळ, कोणती शक्ती गांधींमध्ये होती ज्यामुळे लाखो देशभक्तांची फळी गांधीजींकडे ओढली गेली याचे श्रेय तत्कालीन लेखक आणि साहित्यिक त्यांच्यातील श्रीरामाप्रतीच्या भक्तीला देतात. लहानपणापासून श्रीरामाच्या नामस्मरणाची त्यांना गोडी लागली होती. देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी देशभरात धार्मिक द्वेषाने वातावरण ढवळून निघाले होते. देशाच्या फाळणी प्रक्रियेमध्ये गांधीजींचा प्रमुख सहभाग असल्याने त्यांच्या हत्येचा कट शिजत असल्याची बातमी त्यांच्या कानी आली होती. तेव्हा 'माझ्या मृत्यूच्या क्षणीही श्रीरामाचे नाव माझ्या मुखात असेल' असे विधान त्यांनी केले होते प्रत्यक्षातही मृत्यूच्या क्षणी गांधीजींचे अखेरचे शब्द 'हे राम' असेच होते असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे.

नोआखलीमध्ये दंगल शांत करण्याचा प्रयत्न करत असताना एके दिवशी गांधीजींना खूप ताप आला होता. त्यांच्या वैयक्तिक वैद्या डॉ. सुशीला नय्यर यांनी गांधींना औषध देऊ केले; मात्र त्यांनी औषध घेण्यास स्पष्ट नकार दिला. ते म्हणाले 'मी औषधाऐवजी रामनामाचा पाठ करेन. श्रीरामाला या देहातून आणखी देशकार्य करवून घ्यायचे असेल, तर तो वाचवेल नाहीतर मृत्यू देईल'. श्रीरामाप्रतीच्या त्यांच्या श्रद्धेमुळे त्यांची तब्येतही सुधारली आणि त्यांनी लोकांच्या मनातील द्वेष दूर करण्याचे त्यावेळी मोठे काम केले. 'माझ्यासाठी दशरथाचा पुत्र सीतापती राम हे सर्वशक्तिमान तत्व आहे, त्यांचे नाम हृदयात ठेवल्याने सर्व मानसिक, नैतिक आणि शारीरिक व्याधी दूर होतात.' असे ते नेहमी म्हणत. गांधीजी म्हणतात' असे नक्कीच म्हणता येईल की जर हृदय शुद्ध असेल तर रामनामाची गरज नाही. एवढेच की, रामाच्या नावाशिवाय हृदय शुद्ध करण्याचा दुसरा मार्ग मला माहीत नाही.'

लहानपणी शालेय जीवनात गांधीजी अत्यंत भित्रे होते. त्यांना भुतांचे भय वाटे; मात्र आपल्यातील भय नष्ट होऊन आपणही बलवान आणि धैर्यवान व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. ही भीती त्यांची आया रंभा यांनी घालवली. जेव्हा जेव्हा भीती वाटण्याचा प्रसंग उद्भवेल त्या-त्यावेळी श्रद्धेने श्रीरामाचा नामजप करण्याचा सल्ला रंभा यांनी गांधीजींना दिला गांधीजींनीही त्यांचा सल्ला मान्य केला आणि काही दिवसांतच त्यांची भीती नष्ट झाली. लंडनमध्ये असताना तेथील वातावरणामुळे त्यांची श्रीरामावरील श्रद्धा काही प्रमाणात डळमळीत होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले; मात्र श्रीरामनामाचे बीज त्यांच्या अंतर्मनात खोलवर रुजलेले असल्याने त्यांनी आपले मन काही काळानंतर श्रीरामाच्या नामात गुंतवण्यास आरंभ केला. दक्षिण आफ्रिकेत असताना तेथील परिस्थिती अस्थिर बनली होती. अशाही परिस्थितीत गांधीजी मनाने आणि शरीराने स्थिर होते ते केवळ श्रीरामाच्या नामस्मरणाने असे त्यांनी स्वतः लिहून ठेवले आहे, त्या अस्थिर काळात श्रीरामांचे नाव त्यांच्यासाठी मंत्र बनला होता. एक असा मंत्र जो त्यांना त्यांच्यातील नकारात्मक विचारांचे सकारात्मकतेत परिवर्तन करत होता. क्रोधाचे रूपांतर प्रेमात करत होता, श्रीरामाचा मंत्र त्यांच्या चिरंतन आनंदाचा स्रोत बनला होता. आफ्रिकेत असताना प्रतिदिन कितीतरी किलोमीटर ते चालत. चालताना मनात श्रीरामाचा अखंड जप त्यांचा चालू असे. नाम श्वासाला जोडण्याची कलाही त्यांनी अवगत करून घेतली होती. बाहेरील वातावरणात कितीही उलथापालथ झाली तरी त्यांच्या अंतर्मनाची शांती कधी भंग पावली नाही याचे श्रेयही त्यांनी श्रीराम नामालाच दिले आहे. प्रतिदिन ब्राह्ममुहूर्तावर उठून श्रीरामाच्या चरणी ते प्रार्थना करत असत. मंदिरात जात असत. आजारपणातही त्यांच्या दिनक्रमात कधी भंग पडला नाही. 'रघुपति राघव राजाराम' हे त्यांचे आवडते भजन होते. संत तुलसीदास लिखित श्रीरामचरितमानसचा त्यांचा गाढा अभ्यास होता. दैनंदिन जीवनात इतरांशी संवाद साधताना ते ते श्रीरामचरितमानसमधील दाखले देत असत.

**अशा या थोर रामभक्ताच्या**
**पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी शतशः वंदन !**

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# ... यांची रवानगी पाकिस्तानात करावी !

२६ जानेवारीच्या दिवशी लहान मुलांनी हातात राष्ट्रध्वज घेऊन काढलेल्या फेरीला विरोध करून त्यांना मारहाण केल्याची घटना वाचनात आली. घाटकोपर येथील नित्यानंद नगर परिसरात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून लहान मुलांनी काढलेल्या फेरीमध्ये 'भारतमाता की जय' घोषणा दिल्या ज्या सहन न झाल्याने एका धर्मांधाने फेरी थांबवून मुलांना मारहाण केली. या घटनेचे पडसाद परिसरात उमटले आणि मोठ्या प्रमाणात वादावादी झाली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला ज्यामध्ये सदर परिसरातील अनेक धर्मांध हातात काठ्या वगैरे घेऊन हल्ला करण्याच्या तयारीत दिसत आहेत. थोड्याच दिवसांपूर्वी मुंब्रा परिसरातील नवनिर्वाचित नगरसेविका सहर शेख हिने संपूर्ण मुंब्याला हिरवा करण्याची भाषा केली होती. त्यानंतर आता मुंबई उपनगरातील भरगच्च वस्ती असलेल्या घाटकोपरमध्ये प्रजास्त्ताक दिनानिमित्त काढलेल्या ध्वज फेरीला विरोध केला जातो. या घटना नेमके काय प्रतीत करत आहेत. भारतमाता की जय बोलल्याने ज्यांना पोटशूल उठतो त्यांचीं निष्ठा नेमकी कोणत्या देशाशी आहे हे वेगळे सांगायला नको. स्वातंत्र्यानंतर देशाची धर्माच्या आधारावर फाळणी झाली. बहुसंख्य मुस्लिमांना स्वतंत्र पाकिस्तान मिळाला. आता भारतात राहुन ज्यांना आपला परिसर हिरवा करायचा आहे, ज्यांना भारताचे राष्ट्रीय सण सहन होत नाहीत, ज्यांना भारतमातेचा जयजयकार सहन होत नाही अशांना भारताने तरी का म्हणून पोसावे ? प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी धार्मिक विद्वेष पसरवू इच्छिणाऱ्या या धर्मांधांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अथवा त्यांची रवानगी थेट पाकिस्तानात करण्यात यावी!

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## गांधीजी

गांधीजी पुण्यतिथी
परिधान करे खादी
एक दिवसी उत्सव
आम्हीचं गांधीवादी

गांधी पुतळ्यापाशी
सर्व पक्षीयाची गर्दी
हारा फुलांचा खच
सगळे देतात वर्दी

पिणारं नाही लिकर
पाळणारं दारु बंदी
अशा तारखेचीसोय
करून ठेवतो आधी

नकोरे मांस मच्छी
आम्ही अहिंसावादी
दुसरे दिवसासाठी
भली लांबडी यादी

सर्वत्र ते गांधीगांधी
एकदिवसाची नांदी
माहीतनाही बापूजी
पुन्हा आठवी कधी

आचार विचारांमध्ये
कुठे नसतात गांधी
विसरून जातो कसे
गोष्ट ही सरळ साधी

कळतीलं खरे गांधी
करता आत्मा शुध्दी
रे अंत्योदय सूर्योदय
जगभरा शांती वृध्दी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## एका निर्णयक्षम नेतृत्वाचा अस्त - आमदार काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त ऐकून मन सुन्न झाले. महाराष्ट्राच्या विकासकामांत अहोरात्र स्वतः ला झोकून देणारा एक 'प्रशासनाचा वाघ' आपल्यातून निघून गेले आहे, हे स्वीकारणे कठीण आहे. त्यांच्या जाण्याने समोर सर्व काही अंधकारमय झाल्यासारखे वाटत आहे. जबरदस्त शब्दसामर्थ्य, ठाम भूमिका आणि निर्णयक्षम नेतृत्व ही दादांची ओळख होती. लोकप्रियतेच्या शिखरावर असताना त्यांचे जाणे मनाला निःशब्द करणारे आहे. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला आमदार होण्याची संधी केवळ आणि केवळ दादांमुळेच मिळाली. शब्दाचे पक्के आणि कामाच्या बाबतीत शिस्तप्रिय असा नेता पुन्हा होणे नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खरा तारणहार म्हणून दादांनी नेहमीच शेती, पाणी, वीज व कर्जमाफी सारख्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली. राज्यातील तमाम बहिणींचा लाडका भाऊ म्हणून त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबवल्या. साखर उद्योगात शिस्त आणत राज्याच्या औद्योगिक प्रगतीला दिशा देण्याचे कामही त्यांनी केले. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा जपत पुढे जाणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे टाकळीढोकेश्वर बाजारपेठ बंद

### टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधनाचे वृत्त देशभर वाऱ्यासारखे पसरताच पारनेर तालुका शोकाकुल झाला. या दुःखद घटनेनंतर महाराष्ट्र सरकारकडून तीन दिवसाचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात ही शोककळा पसरली असून, पारनेर तालुक्यातील दोन्ही राष्ट्रवादी (शरद पवार, अजित पवार) गटाच्या कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.



आज गुरुवार, दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी पारनेर तालुक्यातील मोठ्या बाजारपेठेचे ठिकाण असलेल्या टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी गाव बंदची हाक पुकारण्यात आली. अत्यावश्यक सेवा वगळता सकाळपासून पुकारलेल्या बंदला प्रतिसाद देत व्यवसायिकांनी तसेच नागरिकांनी स्वयंप्रेरणेने आपले आस्थापने बंद ठेवत दिवंगत नेत्याला श्रद्धांजली वाहिली. रस्त्यावरील वाहतूक वगळता व्यापार पूर्ण बंद ठेवण्यात आले होते.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात तसेच पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची चांगलीच राजकीय ताकद असून, अजित पवार यांचा मोठा जनाधार आहे. त्यामुळे दादा आता आपल्यात नाहीत, या बातमीवर विश्वासच बसत नाहीये अशा भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केल्या.

परिसरात ठिकठिकाणी लोक समुहाने उभे राहून या घटनेबद्दल हळहळ व्यक्त करताना दिसत होते. टाकळी ढोकेश्वर गावच्या वेशीसमोर ग्रामस्थांच्या वतीने शोकसभा घेण्यात आली.

यावेळी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, माजी उपसरपंच सुनील चव्हाण, ग्राम. पं.सदस्य दत्तात्रय निवडुंगे, सामाजिक कार्यकर्ते संकेत झावरे, विक्रम झावरे, रविंद्र पायमोडे, अंकुश पायमोडे, संपतराव तराळ, पंडितराव झावरे, बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, श्री.कुसकर, मोहनराव रांधवण यांच्यासह ग्रामस्थ व टाकळी ढोकेश्वर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माझा आधार हरपला; खासदार निलेश लंके भावूक

### आज मी अक्षरशः निःशब्द झालो आहे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्राच्या राजकारणातील तेजस्वी, निर्भिड आणि दिलदारपणा, आणि कार्यकर्त्याला न्याय देणारे नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या विमान अपघाती निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. अजितदादांचे जाणे ही केवळ त्यांच्या कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राची हानी आहे. या पार्श्वभूमीवर माझा महागुरू आणि आधार हरपला अशा शब्दांत खासदार निलेश लंके यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. आज मी अक्षरशः निःशब्द झालो आहे. दादा म्हणजे केवळ नेता नव्हते, तर आम्हाला वडिलधाऱ्या प्रमाणे मायेचा आधार देणारे होते. ठामपणे मार्ग दाखवणारे आणि मायेने पाठीवर हात ठेवणारे आमचे दादा आज आपल्यातून निघून गेले, २०१७ मध्ये मला ज्यावेळी शिवसेनेतून काढण्यात आले, तेव्हा अजितदादांनी मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश देऊन आधार दिला. त्यानंतर २०१९ मध्ये विधानसभेची उमेदवारी देऊन ते थांबले नाहीत, तर पूर्ण ताकदीनिशी मला निवडून आणले. दादांमुळेच मला महाराष्ट्राच्या विधिमंडळात गोरगरीब जनतेचे प्रश्न मांडण्याची संधी मिळाली.

आमदार असताना माझ्या ५ वर्षांच्या कार्यकाळात दादांनी मतदारसंघात विकासाची गंगा आणण्यासाठी सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून दिला. त्यांनी मला नेहमीच भक्कम पाठबळ दिले. सध्याच्या काळात जरी आमचे राजकीय मतप्रवाह वेगळे असले, तरी दादा आणि माझ्यात अखेरपर्यंत स्नेह कायम होता. वैयक्तिक पातळीवर त्यांनी मला मोठी ताकद दिली. दादांच्या पाठबळामुळेच आज सर्वसामान्य कुटुंबातील अनेक युवक उद्योग- व्यवसायात स्थिर उभे आहेत. अत्यंत हुशार शिस्तप्रिय, आणि प्रशासनावर पकड मजबूत असलेले, प्रत्येक कार्यकर्त्याची नावानिशी आपुलकीने चौकशी करणारे दादा आता आपल्यात नाहीत, यावर माझा विश्वासच बसत नाही. जड अंतःकरणाने मी आदरणीय दादांना अश्रुपूर्ण आदरांजली अर्पण करतो. अशा शब्दांत लंके यांनी आपला शोक व्यक्त केला.

## बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी ब्लॉक

### आर्वी, वर्धा व सेलू तालुक्यात गॅन्ट्रीचे काम; प्रत्येकी एक तास वाहिनी पूर्णपणे बंद राहणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, वर्धा :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर नागपूर व वर्धा जिल्ह्यात दि. ३१ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत गॅन्ट्री उभारण्याचे काम १४ टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यामुळे या जिल्ह्याच्या ठिकाणी काही कालावधीसाठी रस्ता बंद राहणार आहे. मार्गावरुन प्रवास करणाऱ्यांनी याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुका व वर्धा जिल्ह्यातील सेलू, आर्वी व वर्धा तालुक्यातून जाणाऱ्या कि.मी ०+००० ते कि.मी ८९+४१३ दरम्यान समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॉफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत ही गॅन्ट्री उभारली जाणार आहे. या कामाच्या टप्यानजीक संबंधित वाहिनीवरील वाहतुक ४५ ते ६० मिनिटांच्या कालावधीकरिता पुर्णतः थांबविण्यात येणार आहे.



दिनांक ३१ जानेवारी रोजी महामार्गावर वर्धा तालुक्यात नागपूर वाहिनीवर साखळी क्रमांक ५८.९ व ५९.५ वर दुपारी १२ ते १ वाजताच्या सुमारास तसेच याच वाहिनीवर साखळी क्रमांक ६५.४ वर दुपारी ३ ते ४वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहील. दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सेलू तालुक्यात नागपूर वाहिनीवर साखळी क्रमांक ३१.५ व ३७.७ वर दुपारी ३ ते ४ वाजता तसेच मुंबई वाहिनीवर ३७.७ व ४५.४ वर दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहील.

दिनांक २ फेब्रुवारी रोजी नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात मुंबई वाहिनीवर साखळी क्रमांक ८.६, ९.५ व ९ वर दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहील. तसेच याच तालुक्यात नागपूर वाहिनीवर साखळी क्रमांक ८.६, ९.५ व ९वर दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहील.

दिनांक ३ फेब्रुवारी रोजी आर्वी तालुक्यात मुंबई वाहिनीवर साखळी क्रमांक ८४.४ वर दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान ब्लॉक राहणार आहे. यादरम्यान सदर भागात वाहतूक ४५ ते ६० मिनीटाच्या कालावधीसाठी पुर्णतः थांबवण्यात येणार आहे. महामार्गावरुन या दिवशी प्रवास करणाऱ्यांनी याची नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

## मनोमिलन २०२६ मध्ये समाजाचा अभिमान उंचावला

### ४ वर्षांच्या अधीर जुन्नावारचा राष्ट्रीय सुवर्ण पराक्रम; आर्य वैश्य समाजातर्फे सन्मान



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** श्री विश्व कन्यका आर्य वैश्य समाज बहुउद्देशीय संस्था, रामनगर, चंद्रपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मनोमिलन २०२६ उपवर-उपवधू परिचय मेळाव्यात समाजाचा अभिमान ठरलेल्या अवघ्या चार वर्षांच्या अधीर अमृता सुबोध जुन्नावार याचा राष्ट्रीय स्तरावरील इनलाईन स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या मेळाव्याच्या निमित्ताने केवळ विवाहयोग्य युवक-युवतींचा परिचयच नव्हे, तर समाजातील गुणवंत, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्याची परंपरा समाजाने जपली असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

अधीर जुन्नावार हा चंद्रपूर येथील माउंट कार्मेल कॉन्वेंट स्कूल येथे नर्सरी वर्गात शिक्षण घेत असून, इतक्या लहान वयात त्याने इनलाईन स्केटिंग या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवून चंद्रपूर शहरासह संपूर्ण आर्य वैश्य समाजाचे नाव देशपातळीवर उज्ज्वल केले आहे. विशेष म्हणजे, या वयोगटात राष्ट्रीय पातळीवर असे यश मिळवणारा अधीर हा दुर्मिळ उदाहरण ठरला आहे. अधीरच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत मनोमिलन २०२६ उपवर-उपवधू परिचय मेळाव्यात समाजाच्या वतीने त्याचा विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकारिणी समितीने अधीरला सन्मानचिन्ह देत त्याच्या उज्ज्वल भवितव्याबाबत शुभेच्छा दिल्या.

श्री विश्व कन्यका आर्य वैश्य समाज बहुउद्देशीय संस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व विवाहविषयक उपक्रमांच्या माध्यमातून समाज संघटन व प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. समाजातील नव्या पिढीला प्रोत्साहन देणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणे व सकारात्मक आदर्श निर्माण करणे, हा संस्थेचा जुना आणि गौरवशाली इतिहास राहिला आहे. यापूर्वीही अधीरने दैनिक भास्करच्या वतीने नागपूर येथे आयोजित इनलाईन स्केटिंग स्पर्धेत सहभाग नोंदवून पदक मिळवले असून, तसेच प्रजासत्ताक दिनी तिरंगा हातात घेऊन गांधी चौक ते जटपुरा गेट दरम्यान अवघ्या ७ मिनिटांत स्केटिंग करत देशभक्तीपूर्ण पराक्रम साकारला होता.

## स्व.वसंतराव दादांच्या कालखंडातील योगदान महत्वाचे - सुजित झावरे पाटील

### वासुंदे येथे वसंतराव झावरे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या विकासामध्ये उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांचे मोठे योगदान राहिले आहे. माझे वडील स्व.माजी आमदार वसंतराव झावरे पाटील यांच्या कालखंडात अजितदादांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली. त्यांच्या दूरदृष्टी आणि सहकार्यामुळे पारनेरला विकासाच्या उंचीवर नेले गेले. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांत अजितदादांच्या मार्गदर्शनाने अनेक प्रकल्प पूर्ण झाले. स्व.वसंतराव दादांच्या कार्याला पूरक ठरलेले हे योगदान आजही तालुक्यातील जनतेला प्रेरणा देत आहे. अजितदादांच्या नेतृत्वाने पारनेरचा कायापालट झाला, हे कायम स्मरणात राहील. असे मत जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील, यांनी मत व्यक्त केले.



पारनेर तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार स्व. वसंतराव झावरे पाटील यांचे १० वे पुण्यस्मरण गुरुवार, दि.२९ जानेवारी २०२६ रोजी वासुंदे येथे भावपूर्ण वातावरणात साजरे झाले. या निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना सुध्दा श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील, सुदेश झावरे पाटील यांच्या हस्ते श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्व.वसंतराव झावरे पाटील यांनी पारनेर तालुक्याच्या विकासासाठी अमूल्य योगदान दिले. ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांत त्यांची दूरदृष्टी आणि अथक परिश्रम लाभले. गोरगरीब जनतेचा आधारस्तंभ म्हणून ते ओळखले जात होते. त्यांच्या कार्याने तालुक्यातील अनेक विकासकामे पूर्ण झाली.

कार्यक्रमात सुजित झावरे पाटील यांनी वडिलांच्या स्मृतीला उजळवताना उपस्थितांना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. स्व. वसंतराव दादांचे तालुक्यातील योगदान कायम स्मरणात राहील, अशी भावना व्यक्त झाली.

यावेळी सुजित झावरे पाटील, सुदेश झावरे पाटील, यांच्यासह माजी सभापती अरुण ठणगे, गुरुदत्त पतसंस्था संस्थापक चेअरमन बा.ठ.झावरे पाटील, सुरेश पठारे, बाळासाहेब खिलारी, रावसाहेब झावरे, महेश पाटील, मोहन रोकडे, मोहन रांधवन, उद्योजक

> स्व.माजी आमदार वसंतराव झावरे पाटील हे पारनेर तालुक्याचे खरे भाग्यविधाते होते. त्यांच्या काळात ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळाली. रस्ते, पाणी, शिक्षण आदी क्षेत्रांत त्यांची दूरदृष्टी आणि जनसेवेची निष्ठा अतुलनीय होती. गोरगरीब जनतेचा आधारस्तंभ असलेले वसंतराव दादा आजही आमच्या हृदयात जिवंत आहेत. त्याचा सहवास लाभला ते माझे मार्गदर्शक व गुरू होते. त्यांचे कार्य कायम प्रेरणादायी राहील.
>
> **– बाळासाहेब खिलारी, अध्यक्ष खासदार निलेश लंके प्रतिष्ठान**
>
> ----------------------------------------
>
> स्व. वसंतराव झावरे पाटील हे पारनेर तालुक्याच्या विकासाचे खरे शिल्पकार होते. त्यांच्या काळात ग्रामीण भागाला रस्ते, पाणी, शाळा, आरोग्य सेवा मिळाली. जनतेच्या हृदयात घर करणारे वसंतराव दादा गोरगरिबांचे खरे रक्षक होते. त्यांची निष्ठा, दूरदृष्टी आणि सेवाभाव आजही आम्हाला मार्गदर्शन करतो. त्यांचे कार्य अमर राहील.
>
> **– बा. ठ. झावरे पाटील (चेअरमन, गुरुदत्त पतसंस्था)**

भगवान वाळुंज, स्वप्नील राहिंज, माजी उपसरपंच शंकर बर्वे, सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, रणजित पाटील, नेते शिवाजी खोडदे, युवा नेते अमोल उगले, उद्योजक लहू जाधव, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, मळीभाऊ रांधवन, योगेश वाळुंज, रविंद्र पायमोडे, चेअरमन सूर्यभान भालेकर, जेष्ठ नेते भागुजी झावरे, शरद पाटील, रामचंद्र झावरे, रभाजी झावरे, भाऊ सैद, दिलीप पाटोळे, लहानू झावरे, रा.बा.झावरे, बाळासाहेब झावरे, नारायण झावरे, पो.मा.झावरे, बापुसाहेब गायखे, उद्योजक संदीप दाते, संग्राम झावरे, अशोक चेमटे, पांडुरंग बर्वे, शांताराम झावरे, इंजि. प्रसाद झावरे, शुभम गुंदेचा सुनील टोपले, खंडू टोपले, सोन्याबापू बर्वे साहेब, ए.के ठुबे, सुभाष बर्वे, पी.डी.बर्वे, भाऊसाहेब झावरे, साहेबराव गुंजाळ, संदीप खंडाळे, पत्रकार वसंत रांधवन, बाळासाहेब वाबळे, मारुती उगले, संपत झावरे, शिवाजी झावरे, नितीन बर्वे मेजर, उत्तम तळेकर, आदी उपस्थित होते.

# भानेगाव पारशिवनी टी पॉईंट परिसरात वाहतूक पोलिसांची अवैध वसुली

## सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशतीच वातावरण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा पोलीस ठाणे अलीकडेच नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात वर्ग करण्यात आले आहे. शहर पोलिसांकडे हायटेक प्रणाली अस्तित्वात असल्याम ूळे पारदर्शकता येईल अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेला होती.

मात्र, झाले उलट कामठी विभागातील वाहतूक पोलिसांच्या मनमानी कारभार व अवैध वसुलीम ूळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून दहशतीचे वातावरण निर्माण झाल्यामुळे कर्तव्यात कसूर करणाऱ्या कामठी विभागातील वाहतूक पोलीसांना निलंबित करण्याची मागणी वाहतूक विभागाचे पोलीस उप आयुक्त लोहित मतानी यांच्याकडे खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे.



खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील भानेगाव ते पारशिवनी टी-पॉईंट परिसरात मागील अनेक दिवसांपासून वाहतूक पोलिसांची पथके नियमबाह्यरीत्या तैनात राहून लहान मोठ्या वाहनधारकांना नाहक त्रास देत असून धाक दाखवून आर्थिक लुट करीत आहे. दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास कामठी विभागात कार्यरत विवेक राठोड व नितेश दाबर्डे या दोन वाहतूक पोलिसानी एका 'मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्या कार चालकास पकडले. मोटार वाहन अधिनियम १९८८ कायद्यानुसार दंडात्मक कायदेशीर कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र, वाहतूक पोलिसांनी मद्यप्राशन केलेल्या कार चालकावर कारवाई केली नाही, उलट त्याच्याकडून २ हजार रुपये रोख घेतले. यावेळी परवाना नसल्याचे कारण पुढे करून क्षुल्लक कारण दाखवून ५००/- रुपयांचे नाममात्र चालान फाडले. कामठी विभागात कार्यरत वाहतूक पोलिसांनी स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी शासनाचा महसूल बुडवून एकप्रकारे गुन्हेगाराला अभय दिले आहे. वाहतूक पोलीसांना सद्ररक्षणाय खलनिग्रनाय या ब्रीदवाक्याचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कर्तव्यात कसूर करणाऱ्या वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्याची मागणी खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर व सचिव अभय मिश्रा यांच्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री, पालकमंत्री, पोलीस आयुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक खापरखेडा यांना देण्यात आल्या आहेत.

**ऑटो चालकाकडून हप्ता वसुली**

खापरखेडा ते कामठी मार्गावर धावणारे डझनाच्या वर ऑटो आहेत. मात्र ऑटो चालकाकडून कामठी विभागातील वाहतूक पोलिसांकडून ४०० रुपये म हिना हप्ता वसुल केल्या जात असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली असून प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला वसुली होत असल्याच्या चर्चेने पोलीस विभागाची प्रतिमा मलिन होत आहे.

# खापरखेडा येथे एरोमॉडेलिंग शो २०२६ चा भव्य कार्यक्रम

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** एरोमॉडेलिंग शो २०२६ चा भव्य कार्यक्रम एअरलाइन मॅनेजमेंट नागपूर द्वारे दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी खापरखेडा येथील चणकापूर डब्ल्यूसीएल ग्राउंड्स येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ.आशिष देशमुख (आमदार, सावनेर) यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.समित माहोरे (संचालक, जीवनभर शिक्षण आणि विस्तार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ), डॉ.महेंद्र साळवी (सहाय्यक महाव्यवस्थापक, भारतीय विमानतळ प्राधिकरण, नागपूर), आणि रानू रंजन (उपक्षेत्र व्यवस्थापक, डब्ल्यूसीएल, सिल्लेवाडा) उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक एअरलाइन मॅनेजमेंट नागपूर मधील नितीन जनक पाटील आणि त्यांच्या टीमने विविध प्रकारच्या एरोमॉडेल्सचे लाईव्ह प्रात्यक्षिक सादर केले. ज्यात प्रभावी टेक-ऑफ आणि लँडिंग प्रात्यक्षिके समाविष्ट आहेत. या तांत्रिक आणि शैक्षणिक कार्यक्रमात या भागातील अनेक शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सेंट ॲन्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी परेड आणि सांस्कृतिक नृत्य सादर केले, तर वलणी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सुंदर स्वागतगीत आणि संगीतमय परेड सादर केली.

सेंट ॲन्स स्कूल, दहेगाव, भवन स्कूल, कोराडी, सेंट अँड्र्यू स्कूल, वलणी, महाराष्ट्र विद्यालय महाविद्यालय, खापरखेडा, वलणी हायस्कूल, जिल्हा परिषद शाळा, चनकापूर आणि महाराष्ट्र विद्यालय, सिल्लेवाडा यासह अनेक शाळा आणि महाविद्यालयांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात यशस्वी कार्यक्रमासाठी आयोजक नितीन जनक पाटील आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की या प्रदेशाला अशा एरोमॉडेलिंग आणि एव्हिएशन कार्यक्रमांची नितांत आवश्यकता आहे.

भविष्यात अशा शैक्षणिक आणि तांत्रिक कार्यक्रमांना पाठिंबा देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. प्रमुख पाहुणे डॉ.समित माहोरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भविष्यात विमान उद्योगात रोजगाराची मागणी सातत्याने वाढत आहे. हे लक्षात घेऊन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ लवकरच एअरलाइन मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा प्रोग्राम सुरू करणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना






या क्षेत्रात चांगल्या करिअरच्या संधी उपलब्ध होतील. कार्यक्रमाच्या शेवटी उत्तम कापसे यांनी सर्व पाहुणे, आयोजक, सहभागी आणि प्रेक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्ज्वल बांबेल आणि अंजली इमॅन्युएल यांनी केले. कार्यक्रमाला विलास महल्ले, आशिष फुटाणे, उत्तम कापसे, कृष्णा यादव, संजय गौतम, अशोक तेंडुलकर, मालवीय आणि या भागातील इतर प्रमुख नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विम ान वाहतूक आणि तंत्रज्ञानाबद्दल विद्यार्थ्यांची आवड आणि उत्साह वाढवण्यात एरोमॉडेलिंग शो २०२६ ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# अजितदादांना पाटण शहरात बंद पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२९, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा बारामती येथे विमान अपघाताने झालेल्या अकाली निधनाने गुरवारी पाटण शहरात नागरिकांनी उत्स्फूर्त कडकडीत बंद पाळून व श्रीमंत नागोजीराव पाटणकर वाचनालय येथे सर्व पक्षीय कार्यकर्ते, नागरिकांनी एकत्र येऊन अजितदादांच्या अपघाती निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी बोलताना भाजपाचे पाटण विधानसभा म तदार संघाचे नेते सत्यजीतसिंह पाटणकर म्हणाले, अजितदादांच्या निधनाने म हाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे, दादा दूरदृष्टीचे नेते होते. दादांचे पाटण तालुक्यावर विशेष प्रेम होते. दादांच्या माध्यमातून पाटण तालुक्यात अनेक विकासकामे झाली. सत्ताकाळात पाटणला त्यांनी भरभरून निधी दिला.

पाटणची भाजी मंडई, न्यायालय इम ारत, पंचायत समिती इमारत आदी कामे उभी राहिली. पाटणच्या कार्यकर्त्यांचा आणि त्यांचा जिव्हाळ्याचा सबंध होता, अजितदादा सर्वांची आपुलकीने विचारपूस करायचे. त्यांच्या जाण्याने घरातील व्यक्ती गेल्याची भावना निम ाण झाली आहे. दादांच्या आठवणी निश्चितच स्मरणात राहतील दादांच्या कार्याचा सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

विक्रमबाबा पाटणकर म्हणाले राज्याच्या राजकारणात अनेकांना उभे करायचे काम अजित दादांनी केले. अजितदादांनी शेवटपर्यंत यशवंत विचारसरणी सोडली नाही. दादांना वेगवेगळ्या राजकीय समीकरणातून जावे लागले. अजितदादा कार्यकर्त्यांच्या पाठिशी ठामपणे उभे रहायचे. सर्वधर्म समभावाचा त्यांचा विचार होता. दादांचा पाटणकरांशी जिव्हाळा होता.

पाटण तालुक्यावर त्यांचे विशेष प्रेम होते. तालुक्याच्या विकासात मोठे योगदान दादांनी दिले आहे. अशा भावना विक्रमबाबा पाटणकर यांनी व्यक्त केली.

यावेळी युवानेते याज्ञसेन पाटणकर, उपनगराध्यक्ष सचिन कुंभार, ॲड ए.पी. पाटील, राजाभाऊ काळे, मनोहर यादव, सुरेशनाना पाटील, संजय इंगवले, चंद्रकांत मोरे, अशोकराव गजरे, राजेंद्र कांबळे, अनिल सुतार, संजय कांबळे, मिलन सय्यद, इरफान सातारकर यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले. या शोकसभेस मोठ्या संख्येने सर्व पक्षीय कार्यकर्ते, नागरिक, व्यावसायिक, व्यापारी उपस्थित होते.





**पाटण शहरात नागरिकांच्यातून उत्स्फूर्त बंद**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा बारामती येथे विमान अपघाताने झालेल्या अकाली निधनाने गुरवारी पाटण शहरात नागरिकांनी उत्स्फूर्त कडकडीत बंद पाळला. सोमवार पेठ, एसटी स्टँड परिसर, झेंडा चौक, जुना एसटी स्टँड, भाजी मंडई, रामापूर येथील अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने बंद होती. हा बंद नागरिकांनी अजितदादांच्या प्रती असलेला जिव्हाळा. प्रेमभावना व्यक्त करत उत्स्फूर्त बंद पाळल्याचे सांगितले.

# अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्र शोकसागरात; कल्याण-डोंबिवलीत भावपूर्ण श्रद्धांजली

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि २९, कल्याण (ठाणे) :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री सन्माननीय अजितदादा पवार यांच्या अचानक व दुःखद निधनाच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या हृदयद्रावक घटनेने राजकीय, सामाजिक आणि व्यापारी क्षेत्रात तीव्र शोक व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यालयासमोर लोकमान्य कट्टा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी तसेच समाजाच्या विविध



क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने एकत्र आले. अश्रूंनी ओथंबलेल्या डोळ्यांनी उपस्थितांनी अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी दादांचे निर्भीड नेतृत्व, जनतेसाठी अखंडपणे केलेले कार्य आणि संघर्षमय राजकीय वाटचाल यांची आठवण उपस्थितांच्या मनात दाटून आली. जनतेच्या प्रश्नांसाठी कायम झटणारे, सामान्य माणसाशी आपुलकीने वागणारे नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले, यावर विश्वास ठेवणे कठीण असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. अजितदादा पवार यांचे जाणे ही महाराष्ट्रासाठी कधीही न भरून निघणारी हानी असून, त्यांच्या आठवणी आणि कार्य सदैव प्रेरणादायी राहतील, अशा शब्दांत उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# थोडक्यात

## ६ तासांत वाहनफोडीचा पर्दाफाश

**अक्षराज : भानुदास गायकवाड**




**दि.२८, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनफोडी व चोरीच्या घटनेचा तपास करत पोलिसांनी अवघ्या ६ तासांत आरोपीला अटक करून चोरीस गेलेला लॅपटॉप हस्तगत केला आहे. दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी रात्री ७.३० वाजता ते २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजेच्या दरम्यान, रेजेन्सी पार्क, चक्कीनाका, कल्याण (पूर्व) येथे पार्क करून ठेवलेल्या हुंडाई आय-२० कार क्रमांक एम.एच. ०५ सी.व्ही. ६४१० या वाहनाची काच फोडून अज्ञात इसमाने वाहनात ठेवलेला काळ्या रंगाचा डेल कंपनीचा लॅपटॉप चोरी केला. याच परिसरात उभ्या असलेल्या इतर पाच वाहनांच्या काचा फोडून नुकसान करण्यात आले होते.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब), ३२४ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप भालेराव व त्यांच्या पथकाने केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फ ुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीची ओळख पटवण्यात आली.त्यानुसार आरोपी सुजल बाबासाहेब वाघचौरे (वय २१ वर्षे), रा.दत्तु गायकवाड चाळ, रूम नं. ३, गोसावीपुरा, चक्कीनाका, कल्याण (पूर्व) याला गुन्हा घडल्यापासून अवघ्या ६ तासांत अटक करण्यात आली. आरोपीकडून १८,००० रुपये किमतीचा डेल कंपनीचा लॅपटॉप हस्तगत करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कल्याण अतुल झेंडे व सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) गणेश न्हायदे यांच्या सूचनेनुसार ही कारवाईसहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप भालेराव, पोह ५०३ विशाल वाघ, पोह २१५ दत्तु जाधव, पोह ६९३० गोरखनाथ घुगे, पोह ४२० रोहित बुधवंत, पोह ६५९६ विलास जरग, पोलीस नाईक ४५७ दिलीप कोतीयांच्या पथकाने यशस्वीपणे केली.

## राहुरी पोलिसांकडून १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध

### ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १०४ मुली पालकांच्या ताब्यात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी तालुक्यातून अपहरण झालेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा राहुरी पोलिसांनी यशस्वी शोध घेत तिला सुस्थितीत पालकांच्या ताब्यात दिले आहे. ही कारवाई ऑपरेशन मुस्कान अभियानांतर्गत करण्यात आली असून, मागील ९ वर्षांत अपहरण झालेल्या तब्बल १०४ मुलींचा मागील २ वर्षांत शोध घेण्यात राहुरी पोलिसांना यश आले आहे.

राहुरी तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलगी दि. २४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास कोणालाही काहीही न सांगता रागाच्या भरात घरातून निघून गेली होती. ती परत न आल्याने पालकांनी राहुरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला.

गुन्हा दाखल होताच राहुरी पोलीस स्टेशनच्या पथकाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे मुलीचा शोध घेऊन तिला सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात दिले. सदर मुलगी रागाच्या भरात स्वतःहून निघून गेल्याचे सांगत असली तरी तिला कोणी पळवून नेले होते का, धमकी अथवा दबाव टाकण्यात आला होता का, याबाबत पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही यशस्वी कारवाई सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर, तसेच जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत संजय आर. ठेंगे, पोलीस निरीक्षक राहुरी पोलीस स्टेशन, पोसई राजू जाधव, पोहेकॉ राहुल यादव, पोहेकॉ संभाजी बडे, पोकॉ गणेश लिपने, अंकुश भोसले, अमोल भांड, सचिन ताजने, मपोकॉ वंदना पवार व शिवानी गायकवाड यांनी सहभाग घेतला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ राहुल यादव करीत आहेत.

## नमुंमपा च्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे दि.२८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे विमान अपघातात आकस्मिक झालेल्या दु:खद निधनामुळे संपूर्ण देश शोकसागरात बुडाला. ऐकल्यानंतर विश्वास बसणार नाही अशी सर्वांना नि:शब्द करुन टाकणारी ही दुर्दैवी घटना प्रत्येकाला सून्न करुन टाकणारी होती.नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करुन, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, सर्व विभागप्रमुख व अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागत नागरिक यांच्या उपस्थितीत स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनमोल योगदान असणाऱ्या अजितदादा पवार यांच्यासारख्या महनीय नेतृत्वाच्या अचानक निधनामुळे महाराष्ट्राची व प्रशासनाची फार मोठी हानी झाली असल्याचे सांगत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व त्यांच्या कुटूंबियांना या दु:खातून सावरण्याची शक्ती लाभो अशा शब्दात श्रध्दांजली अर्पण केली. आयकॉनिक इमारत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतीच्या पायाभरणीपासून उभारणीपर्यंत तसेच महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामांना गती देण्यात व अनेक प्रसंगात त्यांचे योगदान लाभले जे कधीही विसरता येणार नाही असे आयुक्त म्हणाले. मंत्रालय सेवेत असतांना त्यांच्या कामाची पद्धत जवळून पाहता आली. साताऱ्यामध्ये काम करतांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. कोव्हीड काळात पालघरचा जिल्हाधिकारी असतांना मोठ्या प्रमाणावर कामगार आपल्या गावी स्थलांतर करीत होते. अशा वेळी आवश्यक प्रसंगी रात्री २ वाजताही त्यांच्याशी बोलणे झाले व त्यांनी लगेच मदतही केली. सिडकोत असतांनाही त्यांचे विविध गोष्टींमध्ये मार्गदर्शन मिळाले अशा विविध ठिकाणच्या आठवणी आयुक्तांनी कथन केल्या.

दुर्दैवी विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह निधन झालेले त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव, पायलट कॅ.सुमित कपूर, कॅ.शांभवी पाठक, फ्लाईट अटेंडन्ट पिंकी माळी यांच्याही आत्म्यास चिरशांती लाभो अशी सामूहिक प्रार्थना करीत सर्वांनी स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.